# 'शालेय प्रतिभा दूत'

## (School Innovative Ambassador)

**१. प्रस्तावना**

**१.१ सर्वसाधारण प्रस्तावना**

अविद्येचे रूपांतर विद्येत करायचे असेल तर व्यक्तीला प्रथम शिक्षण घेणे आवश्यक आहे. "शिक्षण म्हणजे सर्वांगीण सुंदर जीवन जगण्याची तयारी" (हर्बर्ट स्पेन्सर,१९३०)[१]."शिक्षण म्हणजे अनुभवांचे पुन: संयोजन होय".(जॉन डूयई,१९५२)[२]."बालकाच्या शरीर,मन आणि आत्मा यातील सर्वोत्कृष्ट अशा सुप्त गुणांचा विकास म्हणजे शिक्षण होय".(महात्मा गांधी,१९४८)[३].

शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. शिक्षणातून विद्यार्थ्यांचा शारीरिक,मानसिक ,बौद्धिक आणि वैचारिक विकास साधला जातो. आजची शिक्षण प्रणाली ही शिक्षक केंद्रीकतेकडून विद्यार्थी केंद्रिकतेकडे स्थानांतरित होत आहे. अशावेळी वर्ग अध्यापनात शिक्षकाची भूमिका देखील बदलत आहे. विद्यार्थ्यांमध्ये शोधक विचार क्षमता, सर्जनशीलता, परस्पर सहकार्य, समस्या निराकारण, नीती तत्वे ,सामाजिक बांधिलकी, शास्त्रीय मनन, सुसंवाद आदि २१ व्या शतकातील जीवन कौशल्य रुजवणे आवश्यक आहे. (राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२०)[४] विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक अभिवृत्ती वाढीस लावण्यासाठी लहान-लहान गटांमध्ये अनुदेशन देऊन प्रत्येक विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमता विकसित करण्यासाठी सहकार्य,सहनशीलता, समानता यासारख्या मुल्यांचा विकास करण्यासाठी वैयक्तिक पातळीवर जी अध्ययनाची उद्दिष्ट्ये साध्य होत नाही, ती साध्य करण्यासाठी शालेय स्तरावर उपक्रम राबविण्याची आवश्यकता आहे.

---

[१] हर्बर्ट स्पेन्सर,१९३०

[२] जॉन डूयई,१९५२

[३] महात्मा गांधी,१९४८

[४] राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२०

दैनंदिन अध्यापन करत असताना उपक्रमकर्त्याला विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सुप्त गुणांची चाहूल लागली. एकाच समस्येकडे वर्गातील विद्यार्थी वेगवेगळ्या दृष्टिने पाहू लागतात आणि ती समस्या सोडविण्यासाठी नवनवीन कल्पना मांडतात. याची प्रचिती वर्ग अध्यापन करत असताना आल्याने विद्यार्थ्यांमधील नव कल्पनेला चालना देण्यासाठी शाळेतील एक समस्या इयत्ता नववीतील विद्यार्थ्यांपुढे मांडली जी विद्यार्थ्यांनाही जाणवत होती. शाळेची इमारत जुनी आणि भौतिक सुविधेने अपुरी आहे ,अशा वेळी विद्यार्थ्यांच्या स्वप्नातील शाळा या विषयावर मार्गदर्शन केल्यानंतर शाळेत बारा तुकड्यांसाठी केवळ **12** वर्गखोल्या ज्या अपुऱ्या असल्याची माहिती विद्यार्थी देऊ लागले. तेव्हा आपणास कशा प्रकारची शाळेची इमारत हवी आहे? याबाबतचे 'ईमारत संरचना' (बिल्डींग स्ट्रक्चर) करण्यास सांगितल्यानंतर विद्यार्थ्यांनी कार्डशीट पेपर वर इमारतीचे उत्कृष्ट आरेखन करून आणले, यातून विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, नाविन्यता दिसून आली.

**१.२ सैद्धांतिक प्रस्तावना**

**अमेरिकेतील संशोधक डॉ.हॉवर्ड गार्डनर यांना मात्र काही वेगळच म्हणायचं होत. त्यांनी बुद्धीमत्तेसंबंधी मेंदूवर सखोल संशोधन करून मानसशास्त्रीय सिद्धांत प्रस्तापित केले आहे. अनेकांच्या मेंदूच्या संशोधनावरून 'फ्रेम्स ऑफ माइन्ड' (1983या पुस्तकातून 'बुद्धिमत्ता एक नसून त्या अनेक प्रकारच्या असतात,' असं त्यांनी जगासमोर मांडलेल आहे.**

**गार्डनरच्या मते, शिकणे ही एक सामाजिक आणि मानसिक प्रक्रिया आहे. जेव्हा विद्यार्थ्यांना त्यांच्या अनेक कौशल्यांचा समतोल समजण्यास सुरुवात होते तेव्हा ते खऱ्या अर्थाने शिकण्यास सुरूवात करत असतात. स्वतची अध्ययन शैली: बोधनिक आणि विचार प्रक्रिया ओळखणे, आपल्या वैयक्तिक सामर्थ्याचा आदर करणे याद्वारे आपण काय आणि कसे शिकण्यास पात्र आहोत याची जाणिव होत असते. बहुविध सिद्धांताची प्रासंगिकता अनेक प्रकारे बदलते . प्रत्येक विद्यार्थी जसा भिन्न आहे, तसा शिक्षकही; त्यामुळे विद्यार्थ्यास येणाऱ्या अडचणी आणि अध्यापनाची भिन्न पद्धत**

**यांचा विचार करून बहुविध बुद्धिमत्ता फ्रेमवर्क वापरुन शाळेतील वातावरण चैतन्यमय आणि खेळीमेळीचे ठेवण्यास मदत होत असते**

जीन पियाजे आणि वायगोत्सकी या विचारवंतानी सहकारी अध्ययन आणि सृजनशीलता यासंदर्भात आपले विविध विचार उपत्तींच्या माध्यमातून मांडलेले दिसून येतात. पियाजे यांच्या उपत्तीनुसार व्यक्ती जेव्हा एकत्र काम करतात तेंव्हा बौद्धिक संघर्ष निर्माण होतो व त्यामुळे व्यक्तींमध्ये तर्क करण्याची क्षमता विकसित होऊन बौद्धिक विकास होतो. जीन पियाजे आणि वायगोत्सकी या दोघांच्या मते विकासाची सुरुवात ही बौद्धिक संघर्षातून होते. विचार आणि तर्क करण्याच्या क्षमतेचा विकास म्हणजे बौद्धिक विकास होय. व्यक्तीचा बौद्धिक विकास हा त्याने तयार केलेल्या मानसिक रचनेचा परिणाम असतो.

स्पेन्सर कागन (१९९०) यांच्या मते, गटकार्यात प्रत्येक विद्यार्थ्यांचा समान सहभाग असतो, गटांमध्ये शिकण्यात प्रत्येकजण सक्रीय सहभागी होण्याच्या दृष्टीने घडणाऱ्या आंतर्क्रिया ज्या एकाचवेळी अनेक गटांमध्ये घडतात त्या महत्त्वाच्या असतात. एकाच वेळी घडणाऱ्या आंतरक्रिया (**Simultaneous Interaction**) हे सहकार्यात्मक अध्ययनाचे महत्त्वाचे तत्त्व आहे. परस्पर सांघिक कार्य घडून येण्यासाठी गट कार्य देणे आवश्यक असते.

सदर नवोपक्रम हा **डॉ हॉवर्ड गार्डनर यांच्या बहुविध बुद्धिमत्तेवर** आधारित असून विद्यार्थ्यांमधील बहुविध बुद्धिमत्ता विचारत घेऊन विविध उपक्रमांची निवड करण्यात आली आहे

## २. नवोपक्रमाची गरज व महत्त्व:-

### २.१ नवोपक्रमाची गरज

सदर उपक्रम विद्यार्थ्यांच्या कृतीयुक्त अध्ययन प्रक्रियेला मदतगार ठरणारा असणार आहे. वर्गातून किमान पाच-सहा विद्यार्थी हे नवकल्पनेचा ध्यास घेणारे तयार करणे गरजेचे आहे. अशा सर्व विद्यार्थ्यांमधून एक विद्यार्थी 'शालेय प्रतिभा दूत' (**School Innovative Ambassador**) म्हणून

तयार करून अन्य विद्यार्थ्यांच्या नवकल्पनेला विकसित करण्यासाठी त्याद्वारे मदत होणार आहे. त्यामुळे सदर उपक्रम गरजेचा आहे. मुलांच्या नवकल्पनांचे दमन होऊ नये तसेच विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक व बौध्दिक कोंडमारा होऊ नये त्यांच्या सर्जनशील भावभावनांना मुक्त व्यासपीठ मिळावे यासाठी सदर उपक्रम गरजेचा आहे.

**२.२ नवोपक्रमाचे महत्त्व-:**

प्रस्तुत उपक्रमाचे महत्त्व हे समाजातील खालील घटकांसाठी आहे.

**अ) विद्यार्थ्यांसाठी:-**

**1)** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ला अपेक्षित शालेय स्तरावरून उपक्रमशील विद्यार्थ्यांची जडण-घडण करण्यासाठी सदर उपक्रम महत्वपूर्ण आहे.

**2)** शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना चालना मिळण्यासाठी उपयुक्त आहे.

**3)** प्रत्येक वर्गातील कमी-जास्त अध्ययन क्षमता असलेले विद्यार्थी एकत्र आल्याने एकमेकांमध्ये अंतरक्रिया घडून येण्यासाठी मदत झाली आहे.

**4)** विद्यार्थ्यांच्या सर्जनशील आणि शोधक विचार क्षमतेला चालना मिळण्यास मदत झाली आहे.

**आ) शिक्षकांसाठी:-**

**1)** शिक्षकांना या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा कृतीयुक्त सहभाग घेण्यासाठीची वातावरण निर्मिती झाली आहे.

**2)** शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या अडचणीचे निरसन करणे,त्यांना योग्य मार्गदर्शन करणे या उपक्रमाद्वारे शक्य झाले आहे. ज्यातून द्विमार्गी संप्रेषण घडून येण्यास मदत होत आहे.

**3)** शिक्षकांना या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील असामान्य प्राविण्य व स्वारस्य शोधण्यासाठी सकारात्मक परिस्थिती निर्माण करण्यास मदत झाली आहे.

**4)** शिक्षकांना या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्य रुजविण्यास मदत होत आहे.

**इ) समाजासाठी:-**

**1)** विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य, सहनशीलता, सौजन्यशीलता, बंधुभाव, नेतृत्वाचा स्वीकार, समानता यासारख्या मूल्यांचा विकास करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरत आहे.

**2)** सामाजिक प्रश्नांबाबतची जाणीव निर्माण होण्यास व त्यासाठी कृती करण्यास सदर नवोपक्रम उपयुक्त ठरत आहे.

**3)** सामाजिकीकरणासाठी व समाजाच्या गतिशीलतेसाठी हा उपक्रम सहाय्यभूत आहे.

**ई) राष्ट्रासाठी:-**

**1)** शाळा, संस्था, जिल्हा, राज्य पातळीवरून विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती दृढ होण्यास मदत झाल्याने देशाची बौद्धिक स्वामित्व हक्क (पेटंट्स) प्रक्रिया गतिशील होण्यास सकारात्मक परिस्थिती निर्माण होत आहे.

**2)** ज्ञानाधारित उद्योजकता निर्माण होण्यास मदत होत आहे.

**3)** पेटंट्सच्या माध्यमातून जगभरातून देशात नवसंपत्तीचा ओघ निर्माण होण्यास सदर उपक्रम मदतगार ठरणार आहे.

**4)** वैज्ञानिक व उपयोजित ज्ञान शाखांना आवश्यक असलेला नवतंत्रज्ञानी युवक मिळण्यास याद्वारे सकारात्मक वातावरण निर्माण होत आहे.

**5)** भारतास दारिद्र्यमुक्त व विषमतामुक्त समृद्ध अशा विकसित राष्ट्राकडे जाण्यासाठीचा पथदीप तयार होत आहे.

**6)** लोकशाहीस पोषक असे कर्मशील,ज्ञानाधिष्ठित नागरिक निर्माण करण्यासाठी सदर उपक्रम उपयुक्त आहे.

**३. नवोपक्रमाची उद्दिष्टे-:**

१) सर्जनशील विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांच्या शोधक वृत्तीला चालना देणे.

२) सर्जनशील विद्यार्थ्यांसाठी नवोपक्रमांची निर्मिती करणे.

३) प्राप्त झालेल्या नवोपक्रमांमधून उत्कृष्ट नवोपक्रमांची निवड करणे.

४) उत्कृष्ट नवोपक्रम बनविणाऱ्या विद्यार्थ्यांची 'शालेय प्रतिभा दूत' म्हणून निवड करणे.

५) शालेय स्तरावर 'शालेय प्रतिभा दूत' समितीची निर्मिती करणे.

सदर उपक्रमाद्वारे कृतीवर आधारित आंतर्क्रिया होत असल्याने अपेक्षित क्षमता व कौशल्य संपादन करण्यास विद्यार्थ्यांना सहाय्य होणार आहे. सदर उपक्रम हा स्वयंअध्ययन, गट अध्ययन, मार्गदर्शित अध्ययन या घटकावर अधिक भर देत असल्याने विद्यार्थ्यांच्या कारणमीमांसा करणे, अमूर्त संकल्पना हाताळणे, समस्यांची सोडवणूक करणे आदि मुलभूत क्षमताचा विकास करण्यास उपयुक्त ठरणार आहे. सदर उपक्रमामुळे शाळेतून 'प्रतिभा दूत' निर्माण होण्यास मदत होणार आहे.

## ४. नवोपक्रमाचे नियोजन:-

### ४.१ उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण

उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाने विश्व जवळ येत चालले आहे. जगभरातील ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या आहेत. म्हणूनच भारत सरकारने २०१० ते २०२० हे दशक नवनिर्मितीचे दशक म्हणून घोषित केले होते. परंतु शालेय स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये नवनिर्मितीक्षम कौशल्य विकसित करण्यासाठी आवश्यक असलेली व्यवस्था देशात म्हणावी तितकी विकसित न झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी म्हणावे तसे प्रयत्न या दशकात दिसून आलेले नाही. जीन पियाजे च्या मते, बुद्धिमत्ता कृतीमधून निर्माण होते तसेच परिसराची आंतरक्रिया साधल्याने व्यक्तीचा विकास होऊन नंतर त्याचे अध्ययन होत असते. अशावेळी विद्यार्थ्यांमध्ये जन्मत: असलेल्या कलागुणांना शोधून त्यांच्यातील सर्जनशीलता विकसित करण्यासाठी अभ्यासक्रमेतर कृतिशील उपक्रमांमधून नवनिर्मिती घडवून आणणे आवश्यक ठरते. आजचा विद्यार्थी अधिक परीक्षाभिमुख बनत असताना त्यास मूल्याधिष्ठित सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनावर आधारित शिक्षण देण्याची गरज आहे (डॉ. नवलगुंदकर.शं.ना. २००८ जुलै २२)[६]

जगातील एकूण सर्जनशीलतेच्या प्रमाणापैकी भारतातील सर्जनशीलतेचे प्रमाण केवळ दोन टक्के आहे सर्जनशीलतेचे प्रमाण वाढवायचे असेल तर शिक्षक-पालक, कुटुंब व समाज यांना प्रथम बदलले पाहिजे. (डॉ. तुपे नवनाथ २००७ जुलै ३०)[७] विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रमशीलता निर्माण होण्यासाठी आणि उद्याच्या नवनिर्मितीक्षम भारतासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणारा आहे. शालेय वर्ग, शाळा, शासन इत्यादी पातळीवरून परस्पर समायोजन घडून आणण्यासाठी नवउपक्रमशील युवकांची पिढी निर्माण होणे आवश्यक आहे. याद्वारे आपल्या देशाला जागतिक पातळीवर विश्वगुरू बनण्याची सुवर्णसंधी प्राप्त होण्यास योग्य वातावरण शालेय स्तरावर तयार होत आहे.

६.डॉ. नवलगुंदकर.शं.ना. २००८ जुलै २२,

७.डॉ. तुपे नवनाथ २००७ जुलै ३०

**४.२ संबधित व्यक्ती चर्चा**

सदर उपक्रम राबविण्यासाठी शिक्षण क्षेत्रातील जाणते लोक, शिक्षक, प्राध्यापक, वरिष्ठ अध्यापक, विद्यापीठीय स्तरावर अध्यापन करणारे शिक्षक, एम.फिल, पीएच.डी मार्गदर्शक, यांच्यासोबत चर्चा केली याशिवाय शालेय स्तरावरील शिक्षण विस्ताराधिकारी, गटशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयातील सहायक संचालक, नवोपक्रम क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविलेले प्राध्यापक, नवोपक्रम क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्राप्त शिक्षक, अधिकारी यांच्यासोबत चर्चा करून सदर उपक्रमाची पुढील दिशा निश्चित केली आहे.

**४.३ साधनांचा विचार**

सदर उपक्रमासाठी शाळेतील वर्गखोल्या, विद्यार्थी, शिक्षक यांची आवश्यकता लागली आहे. कार्डशीट पेपर, ऑडिओ, व्हिडिओ रेकॉर्डर,पुस्तके तसेच इलेक्ट्रॉनिक साहित्यांद्वारे माहिती संकलित केली आहे. माहितीचे विश्लेषण करण्यासाठी संगणक, लॅपटॉप, मोबाइल तसेच शेकडेवारी आदि साधनांचा वापर केला आहे.

**४.४ करावयाच्या कृतींचा क्रम:-** खालील उपक्रम शालेय स्तरावर राबविण्यासाठी विद्यार्थ्यांचा कृतियुक्त सहभाग घेण्यात आला.

**१) रयत क्लास बँक**

**२) पुस्तक दान पेटी**

**३) मी विद्यार्थी, मी अभियंता**

**४) स्वातंत्र्याचा ७५ वा अमृतमहोत्सव, ७५ महापुरुष माहितीपट**

**५) कविता सृजन**

**६) वाढदिवसातून सामाजिक जाणिवेची निर्मिती**

**७) पोस्टर सादरीकरण**

**८) चित्रकलेतून स्व प्रकटीकरण**

**९) वाचनातून मूल्य शिक्षण**

**१०) प्रश्नपेढी निर्मिती**

**११) माझे गाव, माझी संस्कृती**

**१२) वर्ग प्रतिभा समिती (Class Innovative Council)**

**नवोपक्रमाची प्रत्यक्ष कार्यवाही:-**

**१ <u>रयत क्लास बँक</u>:-** रयत क्लास बँक च्या स्थापनेमागील उद्दिष्ट समजावून सांगतिले. प्रती विद्यार्थी १० रुपये याप्रमाणे ठेव जमा करण्यात आली. त्यासाठी गणितात आणि व्यवहारात हुशार असणाऱ्या वर्गातील दोन विद्यार्थिनीची 'बँक कॅशियर' म्हणून निवड केली. जमा-खर्चाचा हिशोब ठेवण्यासाठी दोघींना प्रत्येकी एक वही करण्यास सांगितली. त्यानुसार विद्यार्थीनी आपल्या इच्छेनुसार पैसे जमा केले. रोल क्र.१ ते ३२ चे पैसे एका कॅशियर कडे तर रोल क्र.३३ ते ६६ चे पैसे दुसऱ्या कॅशियर कडे जमा करण्यात आले. रयत क्लास बँकेत जमा झालेले पैसे वर्गात लागणाऱ्या छोट्या-छोट्या वस्तुंच्या खरेदीसाठी, वाढदिवस भेटवस्तू विकत घेण्यासाठी, गरजू विद्यार्थिनीला वही,पेन देण्यासाठी करण्यात आला. वर्गातील १००% विद्यार्थिनीनी सदर उपक्रमात भाग घेतला.

**२ <u>पुस्तक दान पेटी</u>:-** विद्यार्थी, शिक्षक यांच्या कडे अडगळीत असलेली पुस्तके, वाचून झालेली पुस्तके, जुनी पुस्तके एकत्रित करून 'पुस्तक दान पेटी' तयार करण्यात आली. मंदिरात गेल्यावर आपण पैसे दान करतो. त्या पैशांचे पुढे काय होते? ते कुठे खर्च होतात? याची माहिती दान देणाऱ्याला लागत नाही. हीच संकल्पना पुस्तकांच्या एकत्रीकरणासाठी आणि वाचन संस्कृती जोपासण्यासाठी 'पुस्तक दान पेटीसाठी' राबविण्यात आली. जमा झालेल्या पुस्तकांच्या नोंदी ठेवण्यासाठी नोंदवही करण्यात आली. त्याकरिता वर्गातील एका विद्यार्थिनीची निवड 'वर्ग ग्रंथपाल' म्हणून करण्यात आली. 'पुस्तक दान पेटीत' जमा झालेले पुस्तके ज्यांना हवे असेल त्यांनी रीतसर नोंद करून स्व:ताच्या नावावर ती घेण्याचे ठरवले. पुस्तक लेन-देन साठी नियमावली बनवून त्यानुसार एक पुस्तक आठ दिवसांसाठी देण्याचे ठरविण्यात आले. या उपक्रमासाठी वर्गातील ६०% पेक्षा अधिक विद्यार्थिनीनी सदर उपक्रमात भाग घेऊन पुस्तके दान केली. जवळपास ६० ते ७० पुस्तके यातून वर्गात जमा झाली आहे. **सदर उपक्रम इयत्ता ६ वी आणि इयत्ता ९ वी अशा दोन वर्गात राबविण्यात आला आहे**.

**३ <u>मी विद्यार्थी, मी अभियंता</u>:-** विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्य वाढीस लागावे याकरिता सदर उपक्रम राबविण्यात आला. त्यानुसार 'माझ्या स्वप्नातील शाळा' या विषयांतर्गत शाळेचे 'बिल्डींग स्ट्रक्चर' बनविण्यात आले. शाळेची उपलब्ध जागा त्यानुसार विद्यार्थिनीनी कार्ड-शीट पेपरवर भविष्यातील दोन मजले असलेली **'L'** आकाराची 'बिल्डींग संरचना' तयार केली. यात शाळेचे मैदान, १२ वर्गखोल्या, ऑफिस, मेडिकल रूम, क्रीडा रूम, आराम कक्ष, संगीत रूम, विज्ञान खोली, सामाजिक शास्त्र खोली, भाषा खोली, समुदेशन खोली, कॉन्फेरंस खोली, ग्रंथालय, प्रयोगशाळा, अडगळीची खोली, पार्किंग व्यवस्था, सुसज्ज शौचालय, गुरुकुल खोली इ. घटकांसाठी योग्य न्याय देण्याचे काम विद्यार्थिनीनी आपल्या 'बिल्डींग संरचना' मध्ये केलेले दिसून आले. भविष्यात शाळा इमारत बांधकाम करण्याचे ठरल्यास या उपक्रमांतर्गत विद्यार्थिनीनी तयार केलेले 'बिल्डींग स्ट्रक्चर' संदर्भासाठी देण्याचे ठरविले आहे. १० विद्यार्थिनीनी 'बिल्डींग स्ट्रक्चर' तयार करून वर्गात सादर केले आहे.

**४ <u>स्वातंत्र्याचा ७५ वा अमृतमहोत्सव, ७५ महापुरुष माहितीपट</u>:-**

१५ ऑगस्ट २०२२ ला भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्ष पूर्ण होत असल्याने हे वर्ष संपूर्ण देशभर अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरे होत आहे. यामागील भाव-भावना विद्यार्थांना समजावून सांगितल्या. स्वातंत्र्याप्राप्तीसाठी ज्या-ज्या महापुरुषांनी योगदान दिले, प्राणांची आहुती दिली, असा किमान ७५ महापुरुषांचा जीवनपट उलगडून सांगण्यासाठी तसेच त्याद्वारे विद्यार्थ्यामध्ये त्याग, असीम राष्ट्रप्रेम, देशाच्या प्रती विजीगिषु वृत्ती निर्माण होण्यासाठी सदर उपक्रम हाती घेतला. वर्गातील प्रत्येकी एक विद्यार्थिनीला एका महापुरुषाबद्दल माहिती गोळा करण्यास सांगून त्याद्वारे एका कार्ड शीट पेपरवर सर्व विद्यार्थिनीनी माहिती लिहून आणली. सदर माहितीचे वर्गात वाचन करण्यात आले. सदर कार्ड शीट पेपर वर्गाच्या वाचनासाठी वर्गाच्या भिंतीवर लावून देण्यात आले. वर्गातील १००% विद्यार्थिनीनी सदर उपक्रमात भाग घेतला.

**५ <u>कविता सृजन</u>:-** विद्यार्थ्यामध्ये साहित्य,कला, संगीत आदि बद्दल अभिरुची निर्माण होण्यासाठी सदर उपक्रम हाती घेण्यात आला. कविता निर्मितीच्या प्रक्रियेद्वारे निसर्ग,देश,आई-वडील, शेती,

शेतकरी, नैसर्गिक आपत्ती,दुष्काळ, मित्र, मैत्रीण आदी विषयाबाबत विद्यार्थ्यांच्या मनात असलेले भाव शब्दबद्ध करण्यासाठी सदर उपक्रम हाती घेण्यात आला. यद्वारे विद्यार्थिनींनी कवितांचे सृजन केले. जवळपास १५ ते २० विद्यार्थिनींनी कविता तयार करून सादर केल्या आहेत. २५ पेक्षा अधिक कविता प्राप्त झाल्या आहेत. सादर केलेल्या कवितांचा 'माझी शाळा,माझी कविता' या सदराखाली कवितासंग्रह प्रकाशित करण्याचा मानस असून योग्य आर्थिक तरतूद झाल्यानंतर त्याबाबत उचित कार्यवाही केली जाईल.

**६) वाढदिवसातून सामाजिक जाणिवेची निर्मिती:-** वर्गातील विद्यार्थ्यांच्या वाढदिवशी शालेय वस्तूची भेट देऊन शाळा, विद्यार्थी, शिक्षक, सहअध्यायी यांच्या बद्दलची आपलेपणाची भावना विद्यार्थी मनात दृढ करण्यासाठी सदर उपक्रम हाती घेण्यात आला आहे. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच सर्व विद्यार्थिनींच्या जन्मतारखा लिहून घेतल्या. आणि त्यानुसार दर महिन्याला अशा विद्यार्थिनींना शालेय भेटवस्तू देऊन त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. गरीब परिस्थितीमुळे घरी ज्यांना वाढदिवस साजरा करता येत नाही. अशा विद्यार्थिनींच्या आयुष्यात शाळेच्या माध्यमातून आनंद देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. याशिवाय वाढदिवस असलेल्या विद्यार्थिनींनी वर्गासाठी शालेय वस्तूंची देखील भेट दिलेली आहे.

**७ <u>पोस्टर सादरीकरण</u>:-** विविध विषयातील आशय घटक समजण्यासाठी 'पोस्टर मेकिंग' करण्यात आले. मराठी, हिंदी, इंग्रजी, विज्ञान, गणित, भूमिती, सामाजिक शास्त्रे आदि विषयातील संकल्पनांचे दृढीकरण होण्यास यद्वारे मदत झाली. वर्ग सजावट करून बोलक्या भिंतीच्या माध्यमातून वर्ग वातावरण समृद्ध करण्यासाठी सदर उपक्रम हाती घेण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये लेखन कौशल्य, विचार क्षमता निर्माण होण्यास हातभार लागला. विद्यार्थिनींनी स्वतंत्रपणे लेखन करू लागल्या. कोरोना काळात लेखनाची मोडलेली सवय भरून काढण्यासाठी सदर उपक्रम उपयुक्त ठरला आहे. १००% विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवून सुंदर असे पोस्टर तयार केले आहे.

**८. चित्रकलेतून स्व प्रकटीकरण:-** सामाजिक प्रश्नाच्या संदर्भात जनजागृती व्हावी, सामाजिक समस्या चित्राद्वारे मांडण्यासाठी सदर उपक्रम हाती घेण्यात आला होता. त्यानुसार वर्गातील १००% विद्यार्थिनीनी सहभाग नोंदविला आहे. जागतिक हवामान बदलामुळे मानव जातीलाच धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे पृथ्वीच्या रक्षणाची जबाबदारी प्रत्येकाची असून त्यात देशाच्या भावी पिढीने योगदान द्यावे यासाठी 'वसुंधरा बचाव' या थीम वर आधारित चित्रनिर्मिती करण्याचा प्रयत्न विद्यार्थिनीनी केला आहे. स्वत:च्या कल्पनेतील 'वसुंधरा' रेखाटन्याचा प्रयत्न सदर उपक्रमाद्वारे करण्यात आला आहे.

**९. वाचनातून मूल्य शिक्षण:-** सर्वच वयोगटांतील विद्यार्थांना मूल्यशिक्षणाची गरज आहे. मात्र, ते घेण्याची कोणाचीच इच्छाच नाही.वास्तविक मोठ्यांनी मूल्यशिक्षण घेतलं आणि आचरणात आणलं तर नवीन पिढीला वेगळं मूल्यशिक्षण देण्याची गरजच भासणार नाही; कारण नवी पिढी मोठ्याच्या अनुकरणातून शिकत असते. मात्र असे होताना दिसत नाही. मूल्यांच्या अभावामुळे अनेक जण एकाकी, एकांगी, हतबल, निरुत्साही, नैराश्यग्रस्त बनत आहेत,त्यामुळे व्यापक मानवतेचा संदेश देणारे, चांगला माणूस घडविण्यावर भर देणारे, मुलांना प्रश्न विचारायला लावणारे, प्रत्येक मुलाचे वेगळेपण जपणारे आणि राज्यघटनेच्या चौकटीत राहणारे मूल्यशिक्षण देणे काळाची गरज आहे.

सदर उपक्रमासाठी **'श्यामची आई'** या पुस्तकाची निवड करण्यात आली आहे. इ.९ वीच्या ७५ विद्यार्थिनीना ७५ पुस्तके दिवाळीच्या सुट्टीमध्ये वाचनासाठी देण्यात आली आहे. त्यानंतर सदर पुस्तकावर आधारित आकलन, समायोजन, स्व जाणीव,उपयोजन आदि घटकावर आधारित १०० मार्काची परीक्षा घेऊन सदर पुस्तकातून विद्यार्थ्यांमध्ये कोणती मूल्य विकसित झाली याचा आढावा घेण्यात आला आहे.त्यातील काही महत्त्वाचे मुद्दे **१) १००% विद्यार्थिनीनी आपल्या आईचे कुटुंबातील स्थान महत्वपूर्ण मानले आहे. २) ९५% विद्यार्थिनीनी घरकामात आईला मदत करतात हे यातून दिसून आले आहे. ५% विद्यार्थिनीच्या घरी संयुक्त कुटुंब पद्धत असल्याने घरकामात मदत करत नसल्याचे नमूद केले आहे. ३) आपल्या जीवनात आईचे स्थान काय ? या प्रश्नाचे उत्तर देताना**

**विविधांगी मत आल्याचे दिसून आले आहे उदा.आई म्हणजे ममता आई म्हणजे ईश्वर आई म्हणजे माझी गुरु, देव स्वत: या जगात येऊ शकत नाही म्हणून त्याने आईला या जगात पाठविले. आई आम्हाला घडविते, माझ्या घडविण्यात माझ्या आईचे स्थान महत्त्वाचे आहे. असे वेगवेगळे मत या उत्तरातून आलेले दिसून येते. ४) आजचा श्याम आणि श्यामच्या पुस्तकातील श्याम यातील अंतर सुरेख पणे रेखाटले आहे.** २१ व्या शतकातील नागरिक हा संवेदनशील बनण्यासाठी सदर उपक्रम मदतगार ठरणार आहे.

**१०) प्रश्नपेढी निर्मिती:-** ज्ञानांची चाचणी घेणारे अथवा निर्मिती करणारे विधान म्हणजे प्रश्न होय. सदर उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांच्या प्रश्नरचना कौशल्यावर भर दिलेला आहे. मुक्त प्रश्न,आकलनवरील प्रश्न, उपयोजनवरील प्रश्न आदि प्रश्नाची निर्मिती याद्वारे करण्यात आली आहे. इ.९ वीच्या 'सामाजिक शास्त्र' या विषयाची सदर उपक्रमासाठी निवड करण्यात आली होती. सदर विषयात इतिहास, भूगोल व राज्यशास्त्र या विषयांचा समावेश होतो. या तीनही विषयावर प्रश्ननिर्मिती करण्यात आली आहे. प्रश्नाची रचना करताना तो प्रश्न संदिग्ध, शब्दजंजाळ, गुंतागुंतीचा संमिश्र स्वरूपाचे प्रश्न टाळून अर्थबोध करणारे प्रश्न निर्मितीचे काम विद्यार्थ्यांनी केले आहे.

सदर उपक्रमासाठी विद्यार्थ्यांना गट कार्यानुसार काम देण्यात आले. संपूर्ण वर्गाचे ८ गट करण्यात आले. सदर गटास १) राजमाता जिजाऊ गट २)शिव छत्रपती गट ३) झांशीची राणी गट ४)सावित्रीबाई फुले गट ५)डॉ. बाबासाहेब आंबेडकर गट ६) अहिल्याबाई होळकर गट ७) डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम गट ८) इंदिरा गांधी गट अशा ८ गटामध्ये ७५ विद्यार्थिनीची समान विभागणी करण्यात आली. सदर गटांचा एक गटप्रमुख नेमण्यात आला व त्या द्वारे त्या-त्या गटाचे कामकाज पाहण्याची जबाबदारी गटप्रमुखांवर सोपविण्यात आली. गटानुसार सहकार्यात्मक पद्धतीने विद्यार्थिनीनी 'प्रश्नपेढी निर्मिती' पूर्ण केली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रश्न निर्मिती कौशल्याची जाणीव झाली. प्रश्नाचे प्रकार समजण्यास मदत झाली. परीक्षेला विचारले जाणारे विविधांगी प्रश्न

समजून त्यांची उकल होण्यास मदत झाली. सदर उपक्रमात  वर्गातील १००% विद्यार्थिनीनी भाग घेतला.

**११) माझे गाव माझी संस्कृती :-** गावाची ऐतिहासिक परंपरा, सांस्कृतिक परंपरा, शैक्षणिक, राजकीय, परंपरा विद्यार्थिनींना समजावी यासाठी सदर उपक्रम हाती घेण्यात आला होता. त्यानुसार मुलाखत, प्रश्नावली आदि तंत्राचा वापर करून विद्यार्थिनीनी 'काष्टी, ता.श्रीगोंदा' या गावची माहिती संकलित केली आहे. गावातील वडीलधारी माणसे, नेते, सामाजिक कार्यकर्ते  यांची मुलाखत घेऊन गावाबद्ल माहिती संकलित करण्यात आली आहे. त्यातून 'माझे गाव, माझी संस्कृती' हा उपक्रम पूर्णत्वास नेण्यात आला आहे.

**१२) <u>वर्ग प्रतिभा समिती</u>:-** (**Class Innovative Council**): विद्यार्थ्यांमधील नवोपक्रमशीलतेला चालना देण्साठी 'वर्ग प्रतिभा समितीचे' गठन करण्यात आले आहे. विद्यार्थी, विषय शिक्षक यांचा त्यात समावेश असून या समितीच्या माध्यमातून सर्जनशील विद्यार्थ्यांना शोधण्याचे, त्यांच्यात नेतृत्व गुण, व्यासायिक कौशल्य निर्माण करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. सदर प्रक्रिया निरंतर चालू राहणार असून त्याद्वारे शाळेतून विविध कला-गुण असणाऱ्या विद्यार्थांना सदर उपक्रमाद्वारे मार्गदर्शन करण्यात येत आहे.

**४.५ उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण:-** विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलतेला वाव मिळण्यास मदत झाली आहे.विद्यार्थ्याचा सहभाग हळू हळू वाढत गेला, दैनदिन अध्ययन-अध्यापन प्रक्रियेच्या व्यतिरिक्त सदर उपक्रम राबविला गेल्याने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यास त्याद्वारे मदत झाली. विद्यार्थी कविता रचना करू लागल्या स्व प्रकटीकरण करण्यास मदत झाली.

**४.६ कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक)**:- सदर उपक्रम कोरोना कालावधीत तयार केला गेला. जून-जुलै २०२१ पासून सदर उपक्रमाच्या कार्यवाहीची सुरुवात झाली.

- जून-जुलै २०२१ :- उपक्रमासंदर्भात मार्गदर्शन केले
- ऑगस्ट २०२१ :-  सर्जनशील विद्यार्थ्यांची चाचणी देऊन निवड करण्यात आली
- सप्टेंबर-ऑक्टोबर २०२१:- वाढदिवसातून सामाजिक जाणिवेची निर्मिती उपक्रम

- नोव्हेंबर- डिसेंबर २०२१:- मी विद्यार्थी, मी अभियंता हा उपक्रम राबविण्यात आला.
- जानेवारी - फेब्रवारी २०२१:- रयत क्लास बँक आणि पुस्तक दान पेटी उपक्रम राबविण्यात आले.
- मार्च- एप्रिल २०२१:- 'कविता सृजन' हा उपक्रम राबविण्यात आला
- जून-जुलै २०२२:- उपक्रमासंदर्भात मार्गदर्शन केले. 'स्वातंत्र्याचा ७५ वा अमृतमहोत्सव, ७५ महापुरुष माहितीपट' उपक्रम राबविण्यात आला.
- ऑगस्ट २०२२:- 'पोस्टर सादरीकरण' उपक्रम राबविण्यात आला.
- सप्टेंबर-ऑक्टोबर २०२२:-'चित्रकलेतून स्व प्रकटीकरण' उपक्रम राबविण्यात आला.
- नोव्हेंबर- डिसेंबर २०२२:- 'वाचनातून मूल्य शिक्षण' आणि 'प्रश्नपेढी निर्मिती' इ. उपक्रम राबविण्यात आले.
- डिसेंबर २०२२:- 'वर्ग प्रतिभा समिती' स्थापना आणि 'शालेय प्रतिभा दूत' ची निवड करण्यात आली.

**४.६ उपक्रमासाठी इतरांची मदत:-** सदर उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील मुख्याध्यापिका, पर्यवेक्षक आणि विषय शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांची मदत झाली आहे.

## ४.७ उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे:-

<u>उपक्रमाची छायाचित्रे</u>:-

**१) रयत क्लास बँक,**



२) पुस्तक दान पेटी :- इयत्ता:- ९ वी (अ)




इयत्ता:- ६ वी (अ)





आर्थमंत्री : स्नेहल, आरती
Date: 2/1/2023
Day: Monday
शालेय प्रतिभा दूत
अंतर्गत
पुस्तक दान पेटी
BOND

## ३) मी विद्यार्थी, मी अभियंता:-



### ४) स्वातंत्र्याचा ७५ वा अमृतमहोत्सव, ७५ महापुरुष माहितीपट:-












## ५) कविता सृजन






माझे बाबा.

रात्री उशीरा येतो
पण घरासाठी जिवाचं
रान करतो.....
तो असतो बाबा.....
थोडसं रडवतो
पण परत प्रेमाने
समजावतो.....
तो असतो बाबा.....
काहिही हवं असेल तर
आधी नाही म्हणतो....
आणि हळूच सकाळी
आईपाशी त्यासाठी पैसे
ठेवून जातो.....
तो असतो बाबा....
रात्री उशीरा घरी
आल्यावर चिडतो रागवतो
पण रडवलेल्या चेहऱ्यापाहून
ती गोष्ट कशी चुकीची
आहे ते सांगतो.....
तो असतो बाबा.

नाव :- खडामले महेश्वरी गणेश
इयत्ता :- ९ वी अ.



## ६) पोस्टर सादरीकरण:-






## ७) वाढदिवसातून सामाजिक जाणीवेची निर्मिती






Classteacher : Jadhav Sir..
Good Thought : Tit for Tat
वाढदिवस
भेट वस्तू




When you can dream it
then you can do it......
वाढदिवसाच्या
शुभेच्छा !





## ८) चित्रकलेतून स्व प्रकटीकरण:-






SOLAR ENERGY
REDUCE
RECYLE
SAVE
ENERGY

## ९) वाचनातून मूल्यशिक्षण:-




परीक्षा देताना विद्यार्थिनी





## १०) प्रश्नपेढी निर्मिती:-






**५. <u>नवोपक्रमाची कार्यपद्धती</u>:-**

**५.१ पूर्वस्थितीची निरीक्षणे व त्यांच्या नोंदी:-** उपक्रम राबविण्यापूर्वी विद्यार्थ्यांचा अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतील सहभाग अत्यल्प होता. शिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे देणाऱ्या विद्यार्थिनी ५ ते ६% इतक्याच होत्या. सहशालेय उपक्रमात भाग घेणाऱ्याचे प्रमाण अगदी १०% ते १५% इतके होते. स्वता:च्या कल्पना, विचार मोकळ्यापणाने मांडल्या जात नव्हत्या. विचारांतील खुलेपणा दिसत नव्हता.

**५.२ कार्यवाही दरम्यान केलेली निरीक्षणे व त्यांच्या नोंदी:-** सदर उपक्रम राबिवत असताना सुरुवातीला विद्यार्थी प्रतिसाद कमी होता. परंतु जस-जसा उपक्रम हा पुढे-पुढे जात राहिला तस-तसा विद्यार्थी प्रतिसाद वाढत गेला. **१) कविता सृजन:-** प्रथमत: केवळ एका विद्यार्थिनीनी आपले विचार कागदावर शब्द बद्ध केले. आणि सदर कविता वर्गात सादर केली २) पर्यायाने इतर विद्यार्थीनीना देखील त्यातून प्रेरणा मिळाली आणि मग हळू-हळू विद्यार्थिनी कविता करायला लागल्या. स्वताला अभिव्यक्त करायला त्यांना आवडू लागले. आई, बाबा, मैत्री, शेतकरी आदि विषयावर कविता तयार होऊ लागल्या.यावेळी प्राप्त झालेल्या कवितांचा संकलन करण्यात आले. २) **वाचनातून मूल्यशिक्षण:-** सदर उपक्रम राबविताना साने गुरुजी लिखित 'श्यामची आई' या पुस्तकाची निवड करण्यात आली. ७५ पुस्तकांची खरेदी करून दिवाळी सुट्ट्यांमध्ये सदर पुस्तक विद्यार्थीनीना वाचनासाठी देण्यात आले. शाळा सुरु झाल्यानंतर एक आठवड्याच्या कालावधीनंतर सदर पुस्तकावर आधारित आकलन, उपयोजन, ज्ञान, स्व: जाणीव आदि घटकावर आधारित १०० मार्कांची परीक्षा घेण्यात आली. सर्व विद्यार्थिनीनी परीक्षा दिली. आपल्या आईबद्दल कृतज्ञता व्यक्त होणारी उत्तरे या परीक्षेतून दिसून आली. आई- वडील हेच आपले खरे दैवत आहे, त्यांचा मान-सन्मान ठेवला जावा, त्यांचे नाव बुडवणार नाही असा आशावाद व्यक्त करणारी उत्तरे देखील यातून मिळाली. ज्याप्रमाणे 'श्याम' आपल्या आईचे काम करताना लाजला नाही, त्याप्रमाणे आम्ही देखील आई-बाबाने सांगितलेले काम करताना लाजणार नाही. असे देखील उत्तरे वाचायला मिळाली. **काही बोलक्या प्रतिक्रिया पुढीलप्रमाणे**

# आईची काळजी करणाऱ्या प्रतिक्रिया

(९)

1→ माझी आई आजारी पडल्यानंतर तिची काळजी मी खुप चांगल्या पद्धतीने घेते. एके दिवशी माझी आई आजारी होती आणि माझे शाळेत पेपर सुद्धा चालू होते मला काहीच कळत नव्हते मी शाळेत जाऊ का आई आजारी आहे म्हणुन घरी राहू. मी जरा वेळ विचार केला. व मी म्हणाले पेपर तर मी नंतर ही देऊ शकते. पण आई परत नाही मिळु शकत. म्हणुन मी घरी राहिले. माझी आई खुपच आजारी होती मी तिला जेवायला दिले, नंतरुन औषधे दिले व तिला जरा वेळ आराम करायला सांगितला. आणि मी घरचे सगळे कामे केली. व आईला दवाखान्यात घेऊन गेले. डॉक्टर म्हणाले कि तुझ्या आईला ॲडमिट करावे लागेल. माझ्या आईला डॉक्टरांनी लगेच ॲडमिट केले. आणि मी आईसाठी रात्रभर जागी होते. माझी आई म्हणत होती मला अरे बाळा झोप किती वेळ जागणार. तु पण मी आईच्या समाधाना साठी पाच मिनिट झोपायचे व मला परत जाग यायची मला झोपेच लागेना. माझी आई दोन दिवस ॲडमिट होती. नंतरुन ती आजारातुन मुक्त झाली वर मी तिला घरी घेऊन आले. आई म्हणत होती बाळा तु माझी खुप काळजी घेतली माझ्यासाठी रात्रभर जागली. आता शाळेत जा तुझा पेपर आहे. मग मी शाळेत गेले आणि मी सराना सांगितले की माझी आई आजारी होती त्यामुळे मी पेपरला आले नाही. सर म्हटले बर आहे. का आता तुझ्या आईच. आणि मला पेपर दिला लिहिण्यासाठी.

# आईचे जीवनातील स्थान

(90)

'आई माझी मायेचा
सागर
दिला तिने जीवना
आकार

माझी आई मायेचा सागर आहे तिने माझ्या जीवनाला आकार दिला. माझ्या आईचे मन खूप मोठे आहे. मी चुकले तर कधी चिडले रागवेल पण परत मायेने जवळ घेते. व समजावते. म्हणून माझ्या आयुष्यात माझ्या आईचे स्थान देवा पेक्षा श्रेष्ठ आहे. माझी आई माझा देव आहे......

# आजचा श्याम व श्यामची आई पुस्तकातील श्याम यातील फरक

(२)

प्र०२

(१)→ आजचा श्याम आणि 'श्यामची आई' पुस्तकातील श्याम यांच्यातील फरक पाहिला तर तो खुपच मोठा आहे 'श्यामच्या आई' या पुस्तकातील श्यामच्या मनावर खुप सारे संस्कार हे आईने दिलेले होते उदा:- बाहेरील खेळ खेळणे, आपल्यापेक्षा मोठ्यांचा आदर करणे व छोट्यांवर प्रेम करणे, वाईट काम करण्याची लाज धरणे असे अनेक संस्कार श्यामच्या आईने श्यामवर केले व श्यामने ते स्वत:च्या जीवनात अमलात देखील आणले परंतू जर आजच्या श्यामची गोष्टच निराळी आहे कोणाचीही चांगली गोष्ट अमलात न आणने व वाईट सवयींची लस धरणे उदा:- वाईट सीनेमा पाहणे, वाईट चित्रपट पाहणे, वाईट गोष्टी वाचणे, वाईट गोष्टींना स्वत:च्या जीवनात अमलात आणने आपल्यापेक्षा मोठ्यांचा अनादर करणे व छोट्यांना अपमानित करणे आजचा श्याम तर इतका बिगडलेला आहे की आपल्या आई - वडिलांचाही तो अपमान करीत असतो आपल्या कामाने त्यांना अपमानित होईल असे काम करतो। श्यामच्या आई पुस्तकातील श्यामने कोणती चुक केलेली नाही असे नाही की केली आहे परंतु त्यांने आपल्या चुकीला सुधारली देखील आहे जर आपण कोणती चुक केली आहे तर त्याची लाज 'श्यामच्या आई' पुस्तकातील श्यामने धरली आहे आणि आज पहा आजचा हा श्याम वाईट काम करण्याची लाज तर सोडा परंतू त्याची जाणीव करुन घेणे हेही आवश्यक समजत नाही जर दोन्ही श्याम या दोघातील

# हजारो श्याम या देशात घडावे



४) श्याम जसा घडला तसेच हजारो श्याम या देशात घडावे असे मला वाटते. कारण श्याम हा गुणी, महत्त्वकांक्षी, हुशार, सामाजिक मुलगा आहे. त्याच्या सारखे अनेक श्याम असायला हवे. काही मुले मोठ्या माणसांना, वृद्धांना अपमानीत करतात. म्हणून श्याम जसा घडला तसेच अनेक श्याम घडायला हवेत. उदाहरण श्यामच्या आईला सवित्रीच्या पुजेला जायचे होते. पण ती आजारी होती म्हणून तिने श्यामला सांगितले की तू वडाला फेरे मारण्यासाठी जाशील का? श्याम म्हणाला मी नाही जाणार. मला लाज वाटते. आई म्हणाली राहू दे मी माझे काम करेल. आई म्हणाली की तू चुलीवरच्या खोबऱ्याचा तुकडा खाल्ला तुला हे करायला लाज नाही वाटली का? सिनेमा, मोबाईल पाहायला लाज नाही वाटत तर, देवाची काम करायला कसली लाज, पाप करण्याची लाज धर. हे म्हणणे ऐकून श्याम वट वृक्षाला फेरे मारण्यासाठी हो सांगितले शेवटच्या क्षणी त्याची आईची आई जग सोडून गेली तेव्हा तो म्हणाला की माझी आई नाही तर ही नोकरी कोणत्या कामाची आहे. अश्या श्यामची कथा, स्वभाव, त्याची आई यांचे गुण आपण घेतले पाहिजे. आज-कालची मुले आई-वडीलांना सोडून नवरा-बायको दूर शहरात राहायला जातात म्हणून श्याम जसा घडला तसेच हजारो श्याम या देशात घडावे असे मला वाटते.


**३) प्रश्नपेढी निर्मिती:-** सदर उपक्रम हा गटात दिलेला होता, त्या गटाचा एक गटप्रमुख निवडून त्याद्वारे गटकार्य, परस्पर सहकार्य, परस्पर देवाणघेवाण आदि मूल्य विद्यार्थिनीमध्ये रुजण्यास याद्वारे मदत झाली. सदर गटांना समाजसुधारक,महापुरुष यांचे नावे देऊन गटात काम करण्याबद्दलची प्रेरणा निर्माण होण्यास मदत होत होती याचे देखील निरीक्षण याठिकाणी नोंदविण्यात आले. सर्व गटाने सामाजिक शास्त्र या विषयाची 'प्रश्नपेढी' निर्माण करून प्रश्नाचे स्वरूप समजून घेतले.

**५.३ उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेली निरीक्षणे व त्यांच्या नोंदी:-** १)विद्यार्थ्यांचा कृतीयुक्त सहभाग वाढण्यास हातभार लागला. २)विद्यार्थ्यांच्या सर्जनशील आणि शोधक विचार क्षमतेला चालना मिळण्यास मदत झाली. ३)गटकार्य, परस्पर सहकार्य आदि गुणाची वाढ होण्यास मदत झाली. ४) सदर उपक्रमामुळे वर्ग वातावरण निकोप होण्यास मदत झाली.


**५.४ कार्यवाही करताना आलेल्या अडचणी:-** १)सदर उपक्रम हा माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये राबविला असल्याने मिळालेल्या अध्यापनाच्या तासिका आणि अतिरिक्त तासिका या कालावधीत सदर उपक्रम राबवावा लागला २) उपक्रम राबविताना अन्य विषयांचे तास बुडणार नाही याची दक्षता घेत असताना विषय शिक्षकांना विश्वासात घेऊनच नियोजन करावे लागले. ३)अपुऱ्या वर्ग खोल्या असल्याने आहे त्याच वर्गात मार्गदर्शन करावे लागले, उपक्रमाचे नियोजन करावे लागले. ४) २०२१ या शैक्षणिक वर्षात कोरोनाचे नियम पाळून शाळा सुरु करण्याची परवानगी शासनाने दिली होती, अशावेळी उपक्रम राबविताना कोरोनाचे नियम लक्षात घेऊनच नियोजन करावे लागले. ५) वाचनातून मूल्यशिक्षण या उपक्रमासाठी **'श्यामची आई'** हे पुस्तक खरेदी करताना पैशाची कमतरता भासली अशावेळी, पुणे येथील 'यशोदा पब्लिकेशन' ने सदर उपक्रमाची दखल घेऊन रुपये ६०००/- किंमतीची ५० पुस्तके मोफत दिली. याव्यतिरिक्त ३० पुस्तके ३०% सवलती मध्ये देऊन सहकार्य केले.

५.५ माहितीचे विश्लेषण/ आलेख / तक्ते

१) कविता सृजन:- कविता करण्याची आवड असलेल्या विद्यार्थिनी




२) सामाजिक प्रश्नाविषयी संवेद्नशील विद्यार्थी संख्या:-




**३) नव-नवीन गोष्टी आत्मसात करण्याची आवड:-**




**४) शालेय पुस्तकांव्यतिरिक्त इतर पुस्तके वाचण्यात रस असणारी संख्या:-**




५) चित्रकलेची आवड असणारी विद्‌यार्थी संख्या:-



**६) बचत करण्याची आवड असणारी विद्यार्थी संख्या:-**



**७) आपला देश विकसित व्हावा यासाठी प्रयत्नशील विद्यार्थी संख्या:-**



**६. <u>नवोपक्रमाची फलनिष्पत्ती</u>:-**

१) या उपक्रमातून शाळा स्तरावर विद्यार्थ्यांसाठी सर्जनशीलतेला वाव देणारे व्यासपीठ निर्माण होण्यास मदत झाली आहे.

२) विद्यार्थी,शिक्षक यांच्यात परस्पर आंतरक्रिया घडून येण्यास मदत झाली आहे.

३) विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्ये वाढीस लागण्यास हातभार लागला आहे.

४) सुरुवातीला सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या नगण्य होती, परंतु उपक्रमाच्या अंमलबजावणीनंतर विद्यार्थ्यांमध्ये नवनिर्मितीसाठीची महत्वकांक्षा वाढीस लागण्यास मदत झाली आहे. विद्यार्थी सहभाग वाढण्यास मदत झाली आहे.

५) अभ्यास, परीक्षा, ताण-तणाव यांतून विद्यार्थ्यांना बाहेर पडण्यास मदत झाली आहे.

६) अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत नवचेतना निर्माण होण्यास सकारात्मक परिस्थिती निर्माण झाली आहे.

७) विषय शिक्षकांना आप-आपल्या विषयात घ्यावयाचे छोटे-छोटे उपक्रम व त्यांच्या कार्यवाहीबाबतची प्रक्रिया संदर्भात माहिती मिळण्यास मदत झाली आहे.

८) सर्जनशील विद्यार्थ्यांमध्ये निकोप स्पर्धा निर्माण होऊन त्यातून उत्कृष्ट उपक्रम बनविणाऱ्या विद्यार्थ्यास 'शालेय प्रतिभा दूत' (**School Innovat**ive **Ambassador**) हे पद मिळाल्याने अन्य विद्यार्थ्यांमध्ये सदर प्रतिभाशाली दुताबद्दलचे आकर्षण निर्माण होण्यास मदत झाली आहे.

९) शाळा पातळीवरून राबविले गलेले उपक्रम तालुका, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर राबविण्यासाठीची दिशादर्शक पायरी याद्वारे तयार झाली आहे. देशातील शालेय शिक्षण व्यवस्थेतेला नवोउपक्रम शेत्रात भरीव काम करण्यास मदत होणार आहे.

१०) सदर उपक्रम हा अन्य उपक्रमांपेक्षा वेगळा आहे. या उपक्रमात अध्ययन-अध्यापन प्रक्रिया नाही. विद्यार्थ्यांचे मूल्यमापन नाही तर हा उपक्रम विद्यार्थ्यांमधील उन्मुक्त प्रतिभा दर्शविणारा कृतीयुक्त कार्यक्रम ठरला आहे. जो सतत कार्यप्रवण असणार आहे.

शालेय स्तरावर राबविला जाणारा सदर विषय हा अत्यंत दुर्मिळ आहे. त्यामुळे या विषयावर रचनात्मक काम होणे आवश्यक आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने जुलै २०२१ पासून देशातील ५०,००० शिक्षकांना '**Innovation**' चे प्रशिक्षण देण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. त्यामागचा मुख्य उद्देश म्हणजे देशातील सर्जनशील शिक्षकांकडून सर्जनशील विद्यार्थी निर्माण करणे होय. प्रायोगिक तत्त्वावर केंद्रीय शाळेतील शिक्षक **'Innovation'** चे प्रशिक्षण घेतील आणि त्या प्रशिक्षणाच्या माध्यामतून अन्य शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षण देऊन त्याद्वारे शाळेतील सर्जनशील विद्यार्थी शोधून त्यांना मार्गदर्शन करतील.

सदर उपक्रम कृतियुक्त सहभागातून नवोउपक्रमशील विद्यार्थी घडविण्यास मदतगार ठरणारा आहे. नवोउपक्रम निर्मितीसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्याकडून विविध विषयांवरील महत्त्वपूर्ण उपक्रम बनवून घेण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त आहे. त्यासाठी कृती कार्यक्रम विकसित करणे, शिक्षणशेत्रातील तज्ञाची मदत घेणे, विज्ञान, इतिहास, भूगोल, मराठी, राज्यशास्त्र, गणित, इंग्रजी आदि विषयातील उपक्रम विकसित करून त्यांचे संकलन करणे, वरील विषयात उपक्रम बनविणारे विद्यार्थी (School Innovation Council) मध्ये समाविष्ट करणे इ.स्वरूपाचे काम यामध्ये होत आहे.

**७) समारोप:-** वर्गात चालविलेल्या उपक्रमांची माहिती अन्य वर्गातील मुलांना मिळण्यास मदत झाली आहे. विद्यार्थ्यांमधील सर्जनशील विचार शक्तीला यामुळे चालना मिळण्यास मदत झाली आहे. उपक्रमशील विद्यार्थी सहशालेय कार्यक्रमात अग्रभागी राहण्यास सुरुवात झाली आहे. शाळेत राबविण्यात येणाऱ्या वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, काव्य वाचन स्पर्धा आदि स्पर्धामध्ये विद्यार्थी सहभाग वाढण्यास मदत झाली आहे. '**शालेय प्रतिभा दुत**' या उपक्रमातून तयार झालेले कृती कार्यक्रम

संकलित करून शाळेतील अन्य विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी ते खुले करण्यात येत आहे. कृती कार्यक्रम, विकसन प्रक्रिया याबद्दलचे मार्गदर्शन '**शालेय प्रतिभा दुत**' च्या माध्यमातून शाळेतील विद्यार्थ्यांना देण्याची प्रक्रिया सुरु होण्यास मदत झाली आहे.

**८.संदर्भसूची:-**

**अ) संदर्भ ग्रंथ:-**

१. कुंडले म.बा.(१९९४). अध्यापनशास्त्र आणि पद्धती, पुणे, व्हीनस प्रकाशन, पृष्ठ क्र.१७९-१८०.

२. पंडित बन्सी बिहारी,(१९९७). शिक्षणातील संशोधन, पुणे, नित्य नूतन प्रकाशन.

३. मुळे रा.श. उमाठे वि.तु.(१९९७). शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, सीताबर्डी, नागपूर,महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.

४. पंडित बन्सी बिहारी,(१९९५). शैक्षणिक कृतिसंशोधन, पुणे, नित्य नूतन प्रकाशन.

५. कुकडे-लवळेकर अनघा,(२००४), सामाजिक जाणीव संवर्धन, प्रयोगातून प्रशिक्षणाकडे, पुणे, ज्ञान प्रबोधनी.

६. करंदीकर सुरेश (२०११), शैक्षणिक मानसशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर

७. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार

८. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली.

९. पाटील आनंद,(२००२), सृजनात्मक लेखन, पुणे

१०. कॅलेंडर (२०२१), दि रयत सेवक को-ऑफ लि.सातारा

**ब) वर्तमानपत्रातील संदर्भ:-**

१. तुपे नवनाथ,(२००७,जुलै ३०). व्याख्याता, य.च.म.मु.वि.नाशिक, बालकांच्या हक्कांची पायमल्ली घातक.दै.सकाळ पृष्ठ क्र.२.

२. नवलगुंदकर श.ना.(२००८, जुलै २२).माजी प्र.कुलगुरू, पुणे विद्यापीठ, पुणे विद्यार्थ्यांना संस्कारक्षम शिक्षण द्यावे. दै.सकाळ पृष्ठ क्र.६.

३. पवार शरद (२००८, जुलै २१), केंद्रीय कृषिमंत्री, जगात ज्ञानाच्या क्षेत्रात भारतीयच. दै.सकाळ, पुणे.

**क) वेबसाईट:-**

1.www.indiagov.in
2.www.ncert.gov.in
3.www.education.gov.in

4.shodhganga
5.www.unipune.ac.in/educationdep
6.www.scert.maha.in

## ९.परिशिष्टे (अ)

# सर्जनशील कल चाचणी

विद्यार्थ्यांचे नाव:- दि.

इयत्ता:

सूचना:- १) खालील सर्व सोडविणे प्रश्न अनिवार्य आहे.

२) प्रश्न हे केवळ 'होय' किंवा 'नाही' या उत्तराच्या स्वरूपात लिहावे.

१) तुम्हाला कविता करण्याची आवड आहे का ?

२) तुम्ही सामाजिक प्रश्नांविषयी संवेदनशील होतात का?

३) आपणास नव-नवीन गोष्टी आत्मसात करायला आवडतात का?

४) आपणास शालेय पुस्तकांव्यतिरिक्त अन्य पुस्तके वाचण्यात रस आहे का?

५) आपणास चित्रकलेची आवड आहे का?

६) आपणास दैनंदिन खर्चासाठी दिलेल्या रक्कमेतून बचत करायला आवडते का?

७) तुम्ही तुमचा वाढदिवस मोठ्या उत्साहाने साजरा करतात का?

८) मनात आलेल्या कल्पना, विचार प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी आपण प्रयत्न करतात का?

९) शाळेच्या भौतिक सोईसुविधा सुधारण्याची आपणास आवश्यकता वाटते का?

१०)आपला देश विकसित व्हावा यासाठी आपण प्रयत्नशील राहणार का ?

**(ब)**

रयत शिक्षण संस्थेचे

जनता कन्या विद्यालय, काष्टी

# 'शालेय प्रतिभा दूत' समिति

| अ.क्र | शिक्षकांचे नाव | पद |
|---|---|---|
| १. | सौ. जोगदंड एम.एस | अध्यक्ष |
| २. | श्री. जाधव आर.एस | समन्वयक |
| ३. | श्री. मांडे एस.एस | सदस्य |
| ४. | श्री. शेख आर.एस | सदस्य |
| ५. | श्री. शिंदे बी.आर | सदस्य |
| ६. | श्री. चव्हाण पी.व्ही | सदस्य |
| ७. | श्री. निंबोरे टी.डी | सदस्य |
| ८. | श्रीम. राऊत एस.डब्ल्यू | सदस्या |
| ९. | श्रीम. हगवणे पी.पी | सदस्या |
| १०. | श्री. जायभाय सी.एन | सदस्य |
| ११. | श्री. शिंदे एस. डी | सदस्य |
| १२. | श्री. खामकर पी.जे | सदस्य |
| १३. | श्री. मुळीक डी.पी | सदस्य |
| १४. | श्री. तातळे एस. बी | सदस्य |
| १५. | श्री. डमरे एस.एम | सदस्य |
| १६. | श्री. पवार एस. जी | सदस्य |
| १७. | सौ. शिंदे आर. एस | सदस्या |
| १८. | श्री. साके एन. बी | सचिव |
| १९. | श्री. आढाव व्ही. पं | सचिव |
| २०. | श्री. पवार आर. के | |
| | | |

(क)

'शालेय प्रतिभा दूत' नवोपक्रम अंतर्गत

# श्यामची आई संस्कार परीक्षा

एकूण गुण:- १००          वेळ:-३ तास

सूचना:- सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.

प्रश्न १ला:- दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडा.
(२०)

१) साने गुरुजींचे पूर्ण नाव काय होते?
अ) पांडुरंग सदाशिव साने ब) पांडुरंग सदाशिव सहाणे क) पांडुरंग शिवाजी साने ड) पांडुरंग सदानंद साने

२) साने गुरुजींचा जन्म कोणत्या जिल्ह्यात झाला होता?
अ) रत्नागिरी ब) रायगड क) नाशिक ड) ठाणे

३) 'श्यामची आई' या पुस्तकाचा जन्म कोणत्या जिल्ह्यातील कारागृहात झाला?
अ) पुणे ब) अहमदनगर क) नाशिक ड) रत्नागिरी

४) साने गुरुजी यांनी प्रथमतः कोणते साप्ताहिक सुरु केले?
अ) विद्यार्थी ब) काँग्रेस क) दीनबंधू ड) हरिजन

५) साने गुरुजी यांच्यावर कोणाच्या विचारांचा प्रभाव होता?
अ) महात्मा फुले ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर क) महात्मा गांधी ड) विनोबा भावे

६) 'श्यामची आई' या पुस्तकावर आधारित कोणता चित्रपट तयार करण्यात आला आहे.
अ) माझा श्याम ब) श्यामची आई क) माझी आई ड) साने गुरुजी

७) खोत कोण होता?
अ) शेतसारा वसूल करणारा ब) पैसे जमविणारा क) चोरी करणारा ड) दलाल

८) देवाचे काम करावयास लाजू नको, पाप करण्याची लाज धर हे उद्गार कोणत्या प्रसंगी काढण्यात आलेले आहे.
अ) गणपती पूजा ब) बैल पोळा क) वट सावित्री ड) दिवाळी

९) श्यामची आई या पुस्तकातील 'श्याम' च्या भावाचे नाव काय होते?
अ) श्रीकृष्ण ब) राम क) यशवंत ड) वसंत

१०) श्यामच्या घरी असलेल्या गाईचे नाव काय होते?
अ) सोनी गाय ब) मोरी गाय क) सुनंदा गाय ड) राधा गाय

प्रश्न २ रा:-दिलेल्या प्रश्नाची उत्तरे १०० ते १५० शब्दांपर्यंत लिहा. (कोणतेही सहा प्रश्न सोडवा.)
(३०)

१) 'आजचा श्याम' आणि श्यामची आई या पुस्तकातील 'श्याम' यांत तुम्हाला काय फरक वाटतो? तुमच्या शब्दांत लिहा.

२) देवाचे काम करावयास लाजू नको; पाप करण्याची लाज धर, असे श्यामची आई, श्यामला कोणत्या गोष्टीसाठी म्हटली होती?

३) हुंड्याची अनिष्ट प्रथा दूर करण्यासाठी तुम्ही काय-काय प्रयत्न कराल? समर्पक शब्दांत मांडणी करा.

४) झाडे म्हणजे फुलांच्या माता, फुलांना झाडावर फुलू द्यावे असे श्यामच्या आईने श्यामला का सांगितले असावे? स्वमत प्रकट करा.

५) 'कर्ज म्हणजे जिवंतपणीचा नरक' असे आपणास वाटते का? उदाहरणासह स्पष्ट करा.

६) श्यामने आई आणि मांजर यांच्यातील प्रेमसंबंध कसे रेखाटले आहे.

७) आई आजारी पडल्यानंतर तिची काळजी तुम्ही कशी घ्याल?

प्रश्न ३ रा:- दिलेल्या प्रश्नाची उत्तरे २०० ते २५० शब्दांपर्यंत लिहा (५०)

१) 'श्यामची आई' या पुस्तकातील कोण-कोणते प्रसंग तुम्हाला अधिक भावले? उदाहरणासह स्पष्ट करा.

२) 'श्यामची आई' या पुस्तकातील 'आई' तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

३) आईचे आपल्या जीवनातील स्थान स्पष्ट करा.

४) श्याम जसा घडला तसेच हजारो श्याम या देशात घडावे असे आपणास वाटते का? योग्य उदाहरणासह आपले मत स्पष्ट करा.

५) आईच्या निधनानंतर श्यामने स्वतः मध्ये काय-काय बदल केले? सदर बदल भारतमातेच्या मुक्तेसाठी कसे कामी आले? हे स्पष्ट करा.

## (ड) प्रश्नपेढी निर्मिती उपक्रम

"शरद पवार इन्स्पयार फेलोशिप इन एज्युकेशन अंतर्गत"

**प्रश्नपेढी निर्मिती उपक्रम**

जनता कन्या विद्यालय, काष्टी

इयत्ता: ९ वी तु: अ

एकूण ७५ विद्यार्थीनी

| अ.क्र | विद्यार्थीनी नावे | |
|---|---|---|
| १ | कु.भोसले श्रद्धा पांडुरंग | राजमाता जिजाऊ ग्रुप |
| २ | कु.भोसले तनुजा निलेश | |
| ३ | कु.बोरुडे अस्मिता कैलास | |
| ४ | कु.दांगट श्रुतिका बाळासाहेब | |
| ५ | कु.दांगट प्रगती पोपट | |
| ६ | कु.दांगट सिद्धी भास्कर | |
| ७ | कु.धुमाळ अनुराधा नितीन | |
| ८ | कु.डोमे भक्ती अविनाश | |
| ९ | कु.गोलांडे वर्षा आण्णा | |
| १० | कु.जाधव श्वेता निलेश | |
| | | |
| ११ | कु.काझी मिसबाह इम्रान | शिव छत्रपती ग्रुप |
| १२ | कु.कळसकर दिव्या रामदास | |
| १३ | कु.कळसकर मधुरा मुरलीधर | |
| १४ | कु.कळसकर साक्षी विलास | |
| १५ | कु.कळसकर तनिष्का प्रशांत | |
| १६ | कु. काळे श्रावणी अनिल | |
| १७ | कु.लगड समृद्धी मेघराज | |
| १८ | कु.मोढवे तन्वी योगेश | |
| १९ | कु.नवसुपे दिशा कैलास | |
| २० | कु.पाचपुते गायत्री शांताराम | |
| | | |
| २१ | कु.पाचपुते मधुरा ज्ञानेश्वर | झांशीची राणी ग्रुप |
| २२ | कु.पाचपुते संचिता भाऊसाहेब | |
| २३ | कु.पाचपुते शौर्या सचिन | |
| २४ | कु.पाचपुते श्रावणी निलेश | |
| २५ | कु.पाचपुते स्नेहल अंबादास | |
| २६ | कु.पाचपुते वैष्णवी प्रवीण | |
| २७ | कु.पोकळे प्रिया सुनील | |
| २८ | कु.शेख जोया अख्तर | |
| २९ | कु.थोरात वैष्णवी सतीश | |
| ३० | कु.भिसे तेजस्विनी ज्योतिराम | |

"शरद पवार इन्स्पयार फेलोशिप इन एजुकेशन अंतर्गत"

## प्रश्नपेढी निर्मिती उपक्रम

जनता कन्या विद्यालय, काष्टी

इयत्ता: ९ वी तु: अ

एकूण ७५ विद्यार्थीनी

| अ.क्र | विद्यार्थीनी नावे | |
|---|---|---|
| ३१ | कु.गदादे भक्ती विष्णू | सावित्रीबाई फुले ग्रुप |
| ३२ | कु.गाडेकर वैष्णवी गोरख | |
| ३३ | कु.कोकाटे खुशबू रमेश | |
| ३४ | कु.कोकाटे निवेदिता प्रदीप | |
| ३५ | कु.कोकाटे श्रावणी नवनाथ | |
| ३६ | कु.नवले जिज्ञासा अर्जुन | |
| ३७ | कु.पाचपुते अनामिका रमेश | |
| ३८ | कु.पाचपुते अंजली नितीन | |
| ३९ | कु.राऊत श्रुतिका सचिन | |
| ४० | कु.तांबोळी अलिशा लतीफ | |
| ४१ | कु.वाघमारे प्रतीक्षा सुनील | डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रुप |
| ४२ | कु.घाडगे जान्हवी लालासाहेब | |
| ४३ | कु.घाडगे सुजाता प्रकाश | |
| ४४ | कु.जगताप राधिका चंद्रकांत | |
| ४५ | कु.जगताप श्रुतिका किशोर | |
| ४६ | कु.कानडे ईश्वरी दिगंबर | |
| ४७ | कु.लोंढे तुलसी संजय | |
| ४८ | कु.माने प्रियंका संतोष | |
| ४९ | कु.माने श्रुती पोपट | |
| ५० | कु.माने वैष्णवी राजेंद्र | |
| ५१ | कु.निक्षे आरती गणेश | अहिल्याबाई होळकर ग्रुप |
| ५२ | कु.शेंडगे साक्षी दिलीप | |
| ५३ | कु.खंडागळे माहेश्वरी गणेश | |
| ५४ | कु.पवार नेहा प्रकाश | |
| ५५ | कु.चव्हाण रिया गणेश | |
| ५६ | कु.दातीर पायल संदीप | |
| ५७ | कु.काळे शर्वरी संजय | |
| ५८ | कु.माने श्रद्धा संभाजी | |
| ५९ | कु.राहिंज प्राजक्ता नवनाथ | |
| ६० | कु.राहिंज प्रेरणा शिवाजी | |

"शरद पवार इन्स्पयार फेलोशिप इन एजुकेशन अंतर्गत"

## प्रश्नपेढी निर्मिती उपक्रम

जनता कन्या विद्यालय, काष्टी

इयत्ता: ९ वी तु: अ

एकूण ७५ विद्यार्थीनी

| अ.क्र | विद्यार्थीनी नावे | |
|---|---|---|
| | | |
| ६१ | कु.राहिंज राजश्री संदीप | डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम ग्रुप |
| ६२ | कु.राहिंज साक्षी भास्कर | |
| ६३ | कु.राहिंज साक्षी भाऊ | |
| ६४ | कु.राहिंज सुहानी बंडू | |
| ६५ | कु.राहिंज श्वेता राहुल | |
| ६६ | कु.शेंडगे सृष्टी धूळदेव | |
| ६७ | कु.टकले अनुष्का विलास | |
| ६८ | कु.धोंडगे समृद्धी सुनील | |
| ६९ | कु.क्षीरसागर आर्या अमोल | |
| ७० | कु.चोर पायल सुनील | |
| | | |
| ७१ | कु.मोरे त्रिवेणी स्वप्नील | इंदिरा गांधी ग्रुप |
| ७२ | कु.सोनवणे श्रावणी योगेश | |
| ७३ | कु.पवार पूजा हनुमंत | |
| ७४ | कु.उकाडे ऋतुजा श्रीराम | |
| ७५ | कु. सोनवणे वैष्णवी श्रीकांत | |

## विजेता गट :- झांशीची राणी ग्रुप

**(इ)**

"शरद पवार इन्स्पयार फेलोशिप इन एजुकेशन अंतर्गत"

**प्रश्नपेढी निर्मिती उपक्रम**

जनता कन्या विद्‌यालय, काष्टी

इयत्ता: ९ वी — तु: अ

एकुण ७५ विद्‌यार्थीनी

| | | |
|---|---|---|
| २१ | कु.पाचपुते मधुरा ज्ञानेश्वर | झांशीची राणी ग्रुप |
| २२ | कु.पाचपुते संचिता भाऊसाहेब | |
| २३ | कु.पाचपुते शौर्या सचिन | |
| २४ | कु.पाचपुते श्रावणी निलेश | |
| २५ | कु.पाचपुते स्नेहल अंबादास | |
| २६ | कु.पाचपुते वैष्णवी प्रवीण | |
| २७ | कु.पोकळे प्रिया सुनील | |
| २८ | कु.शेख जोया अख्तर | |
| २९ | कु.थोरात वैष्णवी सतीश | |
| ३० | कु.भिसे तेजस्विनी ज्योतिराम | |

वैष्णवी सतिष थोरात

Vaishu T.

## (ई) 'शालेय प्रतिभा दूत' यादी

| अ.क्र | नवोपक्रम | शालेय प्रतिभा दूत |
|---|---|---|
| १ | कविता सृजन | कुमारी.भाग्यश्री बंडू मोटे |
| २ | मी विद्यार्थी, मी अभियंता | कुमारी. राजलक्ष्मी शरद पाचपुते |
| ३ | पोस्टर सादरीकरण | कुमारी. अलिशा लतीफ तांबोळी |
| ४ | चित्रकलेतून स्व प्रकटीकरण | कुमारी. शौर्या सचिन पाचपुते |
| ५ | प्रश्नपेढी निर्मिती | कुमारी. वैष्णवी सतीश थोरात |
| ६ | वाचनातून मूल्यशिक्षण | कुमारी. ईश्वरी दिगंबर कांनडे |